

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २१७
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.१९ मार्च २०२५

थोडक्यात

चोवीस वर्षीय तरुणीचा झोपेतच मृत्यू...

अक्षराज : सुनील क्षिरसागर

दि.१८, लासलगाव (नाशिक) : टाकळी विंचुर ता.निफाड येथील कल्याणी केशव मोकाटे हिचा झोपेत मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत असून, याबाबत लासलगाव पोलिस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद झाली आहे.

याबाबत गणेश कापसे रा.संधाननगर, टाकळी विंचुर यांनी खबर दिली की,त्यांची बहीण कल्याणी मोकाटे वय २४ हि दि.१५ मार्च रोजी रात्री ११ वा.सुमारास तिचे राहते घरात झोपली असता ती सकाळी ८ वा.पावेतो झोपेतुन उठली नाही म्हणुन, तिला तिचे आईने आवाज दिला असता, तिने काही एक प्रतिसाद दिला नाही. गावातील डॉ.सचिन जांगडा यांनी तिला तपासून ग्रामीण रुग्णालयात नेण्यास सांगितले. शिवा सुरासे व तिचे आई वडील यांनी खाजगी रुग्णवाहिकेतुन ग्रामीण रुग्णलयात नेले असता डॉ.यादव यांनी मयत घोषित केले.याबाबत लासलगाव पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.अधिक तपास स.पो.नि.भास्करराव शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली पो.हवा.उत्तम गोसावी अधिक तपास करीत आहेत.

नवी मुंबई विमानतळाचा पहिला टप्पा पूर्णत्वाकडे

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.१८, नवी मुंबई : डिसेंबर महिन्यात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील दोन धावपट्टींपैकी एका धावपट्टीवर विमान यशस्वीरित्या उतरवण्यात आले. याच दिवशी सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांनी एप्रिल महिन्यात विमानतळ सुरू करण्याची घोषणा केली. मात्र रविवारी अदानी समूहाचे सर्वेसर्वा गौतम अदानी यांनी जून महिन्यात विमानतळाचे उद्घाटन होईल असे जाहीर केले. विमानतळाच्या पहिल्या टप्याचे ८५ टक्क्यांपेक्षा अधिक काम पूर्ण झाल्याने चार टप्यांपैकी पहिला टप्पा जून महिन्यात पूर्ण करुन या विमानतळाचे सुरक्षेचे हस्तांतरण लवकरच केंद्रीय औद्योगिक सूरक्षा दलाकडे (सीआयएसएफ) केले जाण्याच्या हालचाली सुरू आहेत.

नुकताच राज्याचा अर्थसंकल्प जाहीर करताना अर्थमंत्री अजित पवार यांच्या भाषणात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाचा उल्लेख आवर्जून करण्यात आला. या विमानतळाचे काम ८५ टक्यांहून अधिक झाल्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी जाहीर केले. मागील आठवड्यात शुक्रवारी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनीसुद्धा विमानतळ प्रकल्पाच्या ठिकाणी जाऊन कामाचा आढावा घेतला. डिसेंबर महिन्याच्या शेवटी धावपट्टीची चाचणी यशस्वी झाल्यानंतर ४० दिवसांचा काळ विविध परवानग्यांच्या प्रक्रियेत जाणार असे गृहित धरुन सिडको आणि अदानी कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे १७ एप्रिल ही तारीख जाहीर केली होती. रविवारी अदानी समुहाचे प्रमुख गौतम अदानी यांनी विमानतळाच्या कामाची पाहणी केल्यावर उद्घाटनाला जून महिना उजाडेल असे सांगितल्याने सिडको या सरकारी कंपनी आणि अदानी या खासगी कंपनीमध्ये एकवाक्यता नसल्याचे जगजाहीर झाले.

नागपूर दंगलीतील मुख्य सूत्रधाराला बेड्या ठोका - मंत्री बावनकुळे

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.१८, नागपूर : शांतताप्रिय नागपुरातील महाल परिसरात सोमवारी घडलेली हिंसाचाराची घटना दुर्भाग्यपूर्ण असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहे. तथापि, विरोधकांनी या घटनेचे राजकारण न करता समाजकंटकाना शोधण्यासाठी मदत करावी, असे आवाहन महसूल मंत्री व नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. त्यांनी हिंसाचारातील सूत्रधाराला बेड्या ठोकण्याचे आवनहन केले.

हिंसाचारग्रस्त भागातील नागरिकांनी पोलिस आयुक्त कार्यालयात बावनकुळे यांची भेट घेऊन निवेदने दिली. यादरम्यान, वरिष्ठ अधिकाऱ्यांना गुन्हेगारांना शोधून काढण्यासाठी मुलाहिजा ठेवू नका, सूत्रधाराच्या मुसक्या बांधा, असे स्पष्ट आदेश बावनकुळे यांनी पोलिसांना दिले. पोलीस आयुक्त कार्यालयातील बैठकीला पोलीस आयुक्त डॉ. रविंद्रकुमार सिंघल, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर , महापालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पोलीस पूर्णपणे ॲक्शन मोडवर असून, हिंसक घटनेत जवळपास ३४ पोलीस अधिकारी व शिपाई जखमी झाले असून, ५ नागरिक जखमी झाले आहेत, त्यातील तिघांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. घटनास्थळी ५५ वाहने जाळण्यात आली आहेत. खरे तर, सोशल मीडियावर चुकीच्या बातम्या पसरवल्या जात होत्या.त्यामुळे समाजात द्वेष निर्माण झाला. घटनेला जे जबाबदार आहेत त्या समाजकंटकांना पोलीस लवकरच शोधून काढतील. सोशल मीडियावरून ज्यांनी वातावरण

बिघडविण्याचे काम केले त्यांचा शोध महत्त्वाचा आहे. त्या सर्वांवर आमची करडी नजर असल्याचेही बावनकुळे म्हणाले. याप्रसंगी आमदार प्रवीण दटके उपस्थित होते.

सी.सी.टि.व्ही. फूटेजची तपासणी...

हिंसाचार झालेल्या परिसरातील सी.सी.टि.व्ही. कॅमेरामध्ये जे फूटेच आहे ते तपासून घेतले जाईल. कोणऱ्याही स्थितीत नागपूरच्या शांततेला यानंतर गालबोट लागणार नाही यासाठी सर्वांनी दक्षता घेतली पाहिजे. या घटनेत ज्यांचे नुकसान झाले आहे त्यांचे तत्काळ पंचनामे सुरु झाले आहेत, असेही बावनकुळे यांनी सांगितले. नागपूरसह राज्यात अन्यत्र अशा घटना घडणार नाही याची काळजी राज्य शासन घेत असल्याचेही त्यांनी सांगितले.

रुग्णालयात जखमींची भेट

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आढावा बैठकीनंतर न्यू इरा हॉस्पिटल येथे भेट देऊन जखमी पोलीस अधिकारी व नागरिकांची विचारपूस केली. त्यांच्यासमवेत आमदार प्रवीण दटके, पोलीस आयुक्त रवींद्र सिंगल, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. आमदार प्रविण दटके यांनी उपस्थित जखमी रुग्णांच्या नातेवाईकांशी पालकमंत्री बावनकुळे यांच्यासमवेत संवाद साधून दिला. उपचाराबाबत कोणतीही हलगर्जी होता कामा नये, अशी सूचना त्यांनी पडू नये हॉस्पिटल व्यवस्थापनाला केली.

औरंगजेबाचे उदात्तीकरण महाराष्ट्र सहन करणार नाही - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

अक्षराज : जे. के. पोळ

दि.१८, ठाणे : नागपूर येथे झालेली घटना अतिशय दुर्दैवी असून महाराष्ट्र औरंगजेबाचे उदातीकरण सहन करणार नाही अशी ठाम भूमिका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेमध्ये मांडली. नागपूर येथील घटनेवर विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी २८९ नुसार मांडलेल्या प्रस्तावावर उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, औरंगजेब हा महाराष्ट्रावरील एक आक्रमक होता. त्याने महाराष्ट्रातील जनतेवर अनन्वित अत्याचार केले. मंदिरांची तोडफोड केली. अशा औरंगजेबाचे उदात्तीकरण करण्यात येत असेल तर ते खपवून घेतले जाणार नाही. नागपूर येथील घटनेत काही असामाजिक घटकांची मजल पोलिसांवर हल्ला करण्यापर्यंत गेली. ही गंभीर बाब आहे. ही घटना म्हणजे एक पूर्वनियोजित कट असल्याचे दिसून येते. या घटनेमध्ये सहभागी असलेल्या कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. या घटनेमध्ये ३३ पोलीस जखमी झाले असून त्याम ध्ये तीन पोलीस उपायुक्त दर्जाचे अधिकारी जखमी झाले आहेत. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. तसेच ५ नागरिकही गंभीर जखमी झाले आहेत. या नागरिकांवरही उपचार सुरू आहेत, असे शिंदे यांनी सांगितले. औरंगजेबाची कबर हटवण्याच्या मागणीसाठी नागपूर येथे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनानंतर पोलिसांनी परिस्थिती हाताळत शांतता निर्माण केली होती. परंतु, संध्याकाळी काही असामाजिक घटकांनी एकत्र येत दंगलसदृश परिस्थिती निर्माण करण्यास सुरुवात केली. त्यावेळी परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये यासाठी पोलिसांनी बळाचा वापर केला. दंगलखोरांनी पोलिसांवरच हल्ला केला. आगी लावल्या, दुचाकींचे नुकसान

केले. तसेच पोलिसांवर दगडफेकही करण्यात आली. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आलेल्या अग्निशमन दलाच्या जवानांवरही हल्ला करण्यात आला. अशाप्रकारे कायदा हातात घेऊन सामाजिक वातावरण बिघडवणाऱ्या घटकांवर शासन कडक कारवाई करेल, असे शिंदे यांनी सांगितले. राज्यातील एक शांतताप्रिय शहर म्हणून ओळख असलेल्या नागपूर शहरात घडलेली ही घटना अतिशय गंभीर असून यामध्ये सहभागी असलेल्या सर्वांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

या प्रकरणाची पोलीस कसून चौकशी करत असल्याचे सांगून उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, अशा घटना रोखण्यासाठी आपण सर्वांनी पोलिसांना सहकार्य केले पाहिजे. राज्यातील कायदा सुव्यवस्था अबाधित राहिली पाहिजे. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. याठिकाणी अनेक जाती धर्म एकत्र नांदत आहेत. राज्याचा विकास करत आहेत. राज्याच्या विकासात सर्वांचाच सहभाग आहे. पण, सोशल मीडियाच्या माध्यमातून असामाजिक घटक अफवा पसरवून अशा घटना घडवत आहेत. यावर नियंत्रण आलेच पाहिजे. अशा असामाजिक घटकांवर कडक कारवाई करण्याची शासनाची भूमिका असल्याचेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले.

पुणे शहरातील गुन्हेगारी रोखण्यासाठी शासनाचे सर्वतोपरी प्रयत्न - मुख्यमंत्री

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.१८, मुंबई : पुणे शहरात कोयता हातात घेऊन कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्या गुन्हेगारीच्या ९ घटना घडलेल्या आहेत. यामध्ये १९ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यापैकी १३ आरोपी विधी संघर्षित बालके आहेत. पुण्यात कुठल्याही प्रकारची कोयता गँग अस्तित्वात नसून अशा गुन्ह्यांमध्ये १५-१६ वर्षे वयोगटातील मुलांचा समावेश असल्याचे निदर्शनास आले आहे. या विधी संघर्षीत बालकांसाठी दिशा कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. पुण्यातील गुन्हेगारी रोखण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

पुणे शहरातील गुन्हेगारीबाबत सदस्य बापू पठारे यांनी प्रश्न उपस्थित केला होत. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य चेतन तुपे, सिद्धार्थ शिरोळे यांनी सहभाग घेतला.

७ नवीन पोलीस स्टेशन सुरू करण्यास मान्यता

या प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, विधी संघर्षित बालकांसाठी पुण्यात दिशा कार्यक्रम सुरू आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून बालकांचे पुनर्वसन केले जाते. याप्रमाणे काही बालकांचे पुनर्वसनही करण्यात आले आहे. पुणे शहरातील पोलीस ठाण्याची हद्द विस्ताराने मोठी असल्याने अशा परिस्थितीत गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यात मर्यादा येत होत्या. ही बाब ओळखून शासनाने एकाच वेळी पुणे शहरात सात नवीन पोलीस स्टेशन सुरू करण्यास मान्यता दिली आहे. यामध्ये बाणेर, फुरसुंगी, काळे पडळ, आळेफाटा, खराडी, वाघोली आणि नांदेड फाटा पोलीस स्टेशनचा समावेश आहे. नवीन पोलीस स्टेशनच्या निर्मितीमुळे निश्चितच गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविणे सोयीचे होणार आहे. विधीसंघर्षित बालकांना सराईत गुन्हेगार गुन्हेगारी कृत्यांमध्ये उपयोगात आणत असल्याचे निदर्शनास आले आहे. भारतीय न्याय संहितेमध्ये विधी संघर्षित बालकांचा असा उपयोग केल्यास सराईत गुन्हेगारांवर कारवाईचा अधिकार आहे. विधी संघर्षित बालकाचा गुन्हा हा सराईत गुन्हेगारांनी केला असल्याचे मानण्यात येऊन त्यावर कठोर कारवाई करण्यात येईल.

अमली पदार्थांची विक्री, वाहतूक रोखण्यासाठी मोठी मोहीम

राज्यातील अमली पदार्थांची विक्री, वाहतूक रोखण्यासाठी मोठी मोहीम उघडण्यात आली आहे. गेल्या तीन वर्षात मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थ जप्त करण्यात आलेले आहे. हा एक विक्रम आहे. यामध्ये सहभागी असलेल्या नायजेरियन पॅडलरवरपण कारवाई करण्यात आलेली आहे. ' इंस्टाग्राम' वरून थेट संदेश पाठवून अमली पदार्थांच्या ऑर्डर मागवण्यात येतात. अशा ऑर्डरची डिलिव्हरी करणाऱ्या कुरिअर कंपन्यांच्या कार्यालयांची पडताळणी करण्यात आली आहे. कुरियर कंपनीने अमली पदार्थांची 'डिलिव्हरी' दिल्याचे निदर्शनास आल्यास त्यांना गुन्हेगार ठरविणार असल्याचे सूचित करण्यात आले आहे. अमली पदार्थ विक्री करणाऱ्या पान ठेल्यावर कारवाई करण्यात येत आहे. असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

जिल्ह्यात नियमबाह्य लाभ घेणाऱ्या 'लाडक्या बहिणीं' चा शोध सुरू

अक्षराज : वसंत रांधवण

दि.१८, अहिल्यानगर : मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत राज्य सरकारकडून महिन्याला दीड हजार रुपयांचा लाभ घेणार्या जिल्ह्यातील महिलांची पडताळणी राज्य पातळीवरून सुरू करण्यात आली आहे. यासाठी सरकार पातळीवरून परिवहन खात्याकडे नोंदणी असलेल्या महिलांची यादी प्रत्येक जिल्ह्याच्या महिला बालकल्याण विभागाला पाठवण्यात आली आहे. या यादीनुसार आता प्रत्येक जिल्ह्यात लाडकी बहिण योजनेत पात्र ठरलेल्या आणि आर्थिक लाभ घेतलेल्या महिलांची पडताळणी करण्यात येत आहे. सुत्रांच्या माहितीनुसार अहिल्यानगर जिल्ह्यात १८ ते २० हजार महिलांच्या नावे चारचाकी वाहन असून त्यांची तालुकानिहाय पडताळणी सुरू करण्यात आली आहे. दरम्यान अहिल्यानगर जिल्ह्यात बारा लाखांहून अधिक महिला लाडकी बहीण योजनेत लाभ घेत असून यातील पात्र असणार्या महिलांचा शोधाचा राज्य पातळीवरून घेण्याची आदेश देण्यात आले आहेत. एककीकडे सरकार पातळीवरून ही योजना बंद करण्यात येणार नसल्याचे सांगण्यात येत असले तरी योजनेत पात्र नसतांनाही लाभ घेणार्यांची शोध मोहिम सरकारच्यावतीने सुरू करण्यात आली आहे. विधानसभा निवडणुकीच्या आधी राज्य सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली. या योजनेत सुरुवातीला केवळ महिलांच्या प्रतिज्ञापत्रा आधारे त्यांचा या योजने समाविष्ट करण्यात आला. तसेच त्यांना महिन्याला दीड हजार रुपये आर्थिक मदत सुरू करण्यात आली. एकट्या नगर जिल्ह्यात या योजनेत १२ लाखांहून अधिक महिला पात्र करण्यात आल्या होत्या. सुरुवातीचे तीन महिने या योजनेत महिलांना आर्थिक लाभ देण्यात आली. मात्र, विधानसभा निवडणुकीनंतर राज्य पातळीवरून लाडक्या बहिणी योजनेत पात्र असणार्या महिलांची तपासणी सुरू करण्यात आली आहे. यासाठी सरकार पातळीवरून पहिल्या टप्प्यात परिवहन विभागाकडे नोंदणी असणार्या चार चाकी वाहन नावावर असणार्या महिलांची माहिती घेण्यात येत आहे. नगर जिल्ह्यात अशाच प्रकारे चार चाकी वाहन नावावर असलेल्या महिलांची संख्या १८ ते २० हजार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. यातील किती महिला लाडकी बहिण योजनेचा लाभ घेत आहेत,याची पडताळणी घेण्यात येत आहेत. हि पडताळणी पुर्ण झाल्यावर संबंधित महिलांना योजनेतून अपात्र करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. याबाबत जिल्हा प्रशासन आणि महिला बालकल्याण विभागाकडे विचारणा केली असता त्यांनी माहिती देण्यास नकार दिला.

शेतकऱ्यांच्या कर्ज मुक्तीसाठी शिवसेनेचा एल्गार...

अक्षराज : साहेबराव गागलवाड

दि.१८, मुदखेड (नांदेड) : महायुती शासनाने अर्थसंकल्पिय अधिवेशनात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा मुद्दा घेतला नसून जाहीर नाम्यातील आश्वासन हवेतच विरले असुन कर्जमाफीसाठी आता उबाठा शिवसेनेने एल्गार पुकारला असुन शासनाचा निषेध नोंदवत तहसील प्रशासनाला लेखी निवेदन देऊन जन आंदोलनाचा इशारा दिला आहे.

महायुती शासनाने विधानसभा निवडणुकीच्या जाहीर नाम्यात बहुमतांनी सरकार सत्तेत आल्यास शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करण्याचे जाहीर नाम्यात आश्वासन दिले होते. राज्यात महायुती सरकार बहुमतांनी सत्तेवर आले आहे . पहिल्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात शेतकऱ्यांच्या कर्जमाफी केली जाईल अशी आस शेतकऱ्यांना लागली होती. परंतु अर्थमंत्री अजित पवार यांच्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा समावेश करण्यात आलेला नाही. या विरोधात माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी नाराजी व्यक्त करत घरचा आहेर दिला आहे. मुदखेड तालुका उबाठा शिवसेनेने या विरोधात एल्गार पुकारला आहे. शेतकरी अगोदरच आर्थिक संकटात सापडला असुन आत्महत्येचे प्रमाणही वाढत चालले आहे. महायुती शासनाने जाहीर नाम्यात सात बारा कोरा करून कर्जमुक्तीचे आश्वासन शेतकऱ्यांना दिले होते परंतु अर्थसंकल्पिय अधिवेशनात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा हिताचा मुद्दा घेतलेला नाही यविरोधात शासनाचा निषेध नोंदविण्यात आला आहे. या संदर्भात उबाठा शिवसेनेचे तालुका संघटक माधव पावडे, सर्कल प्रमुख विजय देशमुख, शहर प्रमुख सचिन चंद्रे, संदीप पूयड, गंगाधर पाटील मगरे, योगेश टिप्परसे,यांच्या वतीने नायबतहसीलदार मारोती जगताप यांना निवेदन देण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या पीक विम्याचे रक्कम तात्काल देऊन शेतकऱ्यांना आर्थिक साहाय्य करावे अन्यथा उबाठा तालुका शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन झेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

विवाह समारंभातील वाढत्या अपप्रवृत्ती थांबवा !

' हम आपके है कौन...! ' हा ' फॅमिली ड्रामा ' चित्रपट १९९४ मध्ये आला होता. राजश्री प्रोडक्शन चा हा सिनेमा भारतीय संस्कृती आणि संस्कार यावर आधारलेला आहे . त्याकाळी लोकांना हा सिनेमा प्रचंड आवडला. पुढे पुढे या धाटणीचे काही सिनेमे आले. त्यालाही लोकांनी चांगला प्रतिसाद दिला.लोकांना नटखटपणा, प्रेमसंबंध,भावनिकता, नातेसंबंधातील हळुवारपणे सुटत जाणारी वीण... त्यांच्यात होणारी घुसमट, रीती रिवाज,परंपरा, सभ्यता, शालिनीता आणि त्याला जोड म्हणून उत्कृष्ट संगीतबद्द झालेली गाणी असा सर्व मसाला असणारे कौटुंबिक चित्रपट खास आवडतात. हे सर्व हम आपके है कौन! मध्ये होतं. या चित्रपटातील विवाह समारंभ हा सर्वात आकर्षणाचा भाग होता. विवाहातील विविध विधी,परंपरा आणि कार्यक्रम लोक सिनेमागृहात नसून विवाह समारंभात सहभागी झाल्याची अनुभूती देत होते. या लग्न समारंभातील एक मेकांची मजा मस्ती करतानाची दृश्य पुढील काळात भारतीय विवाह पद्धतीचे भाग बनले. त्यातीलच ' जूते ले लो पैसे दे दो...' म्हणत होणाऱ्या भाऊजीचे पायताने लपवून पैसे मागण्याऱ्या मेहुणीचा समाजावर फार मोठा प्रभाव पडला. पुढील काळात या सिनेमा नंतर सप्तपदी,अक्षता सोहळा,हळदी या विवाहातील विधीप्रमाणे ' पादुका चौर्यं ' हा एक सोपस्कार पार पडू लागला. एक प्रकारे समाजमान्यता या वात्रटपणाला मिळाली आहे, असे आपल्याला म्हणता येईल . सिनेमा समाजाला कसा प्रभावित करतो, अपप्रवृत्ती, चुकीचे पायांडे कसे घालून देतो असे अनेक सामाजिक घटना, घडामोडी मध्ये चित्रपटामुळे झालेले बदल पाहून ध्यानात येते.

आज-काल विवाह सोहळ्यात मेहुना,मेहुणी आपल्या होणाऱ्या लाडक्या भाऊजींचे पायताने चोरतात. यातून विवाह सोहळ्यात वादविवाद, भांडण- तंटे आणि हाणामाऱ्या होतात . खर तर लोक ' जूते चोरी ' या सिनेदृश्याचे अंधानुकरण करतील याची कल्पनाही सिनेमा बनवणाऱ्याला नसेल. सिनेमात रंजकता वाढवण्यासाठी प्रत्येक सिनेमात असे नवनवीन प्रयोग केलेले असतात. असंच ' दिल ' या सिनेमांमध्ये कॉलेजला जाणाऱ्या तरुणीची छेड काढण्याची दृश्य आहेत. आमिर खानने जेव्हा ' सत्यमेव जयते !' हा कार्यक्रम एका वाहिनीवर केला, तेव्हा एका भागामध्ये मुलींची छेड काढण्यातून घडलेल्या गुन्ह्यांची, मुलींवर च्या अन्यायाची दखल घेण्यात आली होती. त्यावेळी स्वतः आमिर खानने आपली ' दिल ' सिनेमातील मुलींची छेड काढणारी भूमिका चुकीची होती याबद्दल दिलगिरी व्यक्त केली होती. एकमेकांची मजा मस्ती करताना कुठपर्यंत ताणून धरायचे हे नवतरुणांना ठाऊक नसते. अतिउत्साह आणि उतावळेपणा याने तरुण-तरुणी विवाह सोहळ्यात भारावून गेलेले असतात. विवाह सोहळ्यातून एकमेकांशी मैत्री,नातेसंबंध वाढवले पाहिजेत! ओळखी करून घेतल्या पाहिजेत! मानसन्मान राखला पाहिजे! पण हे दूरच राहते उलट या अपप्रवृत्तीमुळे वैरभाव वाढीस लागतो. आजकाल विवाह सोहळ्यात मद्यप्राशन करणे, वेडेवाकडे नृत्य करणे, मर्यादे पलीकडे जाऊन समोरच्याची टिंगल टवाळी करणे, अक्षता सोहळ्यानंतर वधू-वरांना हार घालण्यासाठी उंच उचलून धरणे यासारख्या अपप्रवृत्ती वाढत आहेत. ज्येष्ठ मंडळी विवाह सोहळ्यात व्यवस्थापन आणि आदरतित्य करणे यामध्ये गुंतलेली असतात. अशा काळात नव तरुणांनी ज्येष्ठ मंडळींना मदत करणे सोडून उलट त्यांच्या चिंतेत भर घालण्याचे काम करणे थांबवले पाहिजे. विवाह सोहळ्यात होणारा खर्च, येणारा ताण तणाव याला तोंड देता देता ज्येष्ठ मंडळी दमून गेलेली असतात. त्यांच्या शांत राहण्याचा, संयम आणि मजबुरीचा फायदा तरुणांनी अशा कार्यक्रमात घेऊ नये. विवाह समारंभ म्हणजेच दोन मनांना जोडणारा, एक संसार उभा करणारा कोणाच्यातरी जीवनातील अति महत्त्वाचा प्रसंग आहे,याचे भान सोहळ्यात सहभागी होणाऱ्या तरुणांनी ठेवले पाहिजे. स्वतःमध्ये निर्माण होणाऱ्या उत्साहाला बांध घालून स्वतःच्या सभ्यतेचे, शहाणपणाचे आणि नम्रतेचे दर्शन सर्वांना घडवले पाहिजे. विवाह समारंभात निर्माण होत असणाऱ्या अपप्रवृत्तीचे अंधनुकरण करणे तरुणांनीच थांबवले पाहिजे.

आला उन्हाळा आरोग्य सांभाळा....!

राज्यात सूर्यनारायणाने आपला प्रकोप दाखवायला सुरुवात केली आहे. मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच राज्यातील तापमान वाढायला सुरुवात झाली होती. सर्वत्र उकाडा जाणवत होता. आता मार्च महिन्याच्या अखेरीस तर राज्यातील अनेक शहरांचे तापमान उच्चांकी पातळीवर पोहचले आहे. राज्यातील अनेक शहरांचे तापमान ४० अंशाच्या घरात पोहचले आहे. काही शहरांनी तर ४० अंशाचा आकडा देखील पार केला आहे.

विदर्भ मराठवाड्यात तर तापमानाने आजच उच्चांक गाठला आहे. पुढील दोन आठवड्यात राज्यातील सर्वच शहरांचे तापमान ४० अंश सेल्सिअसच्या घरात पोहचेल आणि राज्यात प्रचंड उकाडा जाणवेल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. पुढील दोन महिने राज्यातील तापमान उच्चांकी अंशावर पोहचेल आणि राज्यात यावर्षी प्रचंड उकाडा जाणवेल हा हवामान खात्याने वर्तवलेला अंदाज खरा ठरताना दिसत आहे. याशिवाय यावर्षी राज्यात उष्णतेच्या लाटा येतील असाही अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. हा अंदाज नागरिकांची झोप उडवणारा ठरत आहे कारण मार्च महिन्यातच सूर्यनारायणाने आपला प्रकोप दाखवायला सुरुवात केली असल्याने पुढील दोन महिने कसे निघेल याच चिंतेत नागरिक आहेत. पुढील दोन महिन्यात राज्यात उष्णतेच्या लाटा येणार असून तापमान प्रचंड वाढणार असल्याने हे दोन महिने जनतेसाठी जीकरीचे ठरणार असल्याने उन्हापासून बचाव करण्याची कसरत नागरिकांना करावी लागणार आहे. उन्हाळा सुरू झाला की नागरिकांना आरोग्याच्या तक्रारी जाणवू लागतात. उन्हाळ्याच्या झळा वाढल्या की थकवा येणे, चक्कर येणे, हातापायाला गोळे येणे, उष्माघात आणि मृत्यू असे परिणाम माणसांमध्ये दिसून येतात. काहींना डोळ्याचे तर काहींना त्वचेचे विकार जडतात. उन्हाळ्यात विविध प्रकारचे श्वसन विषयक, मेंदूचे आणि हृदयाचे आजार होतात. रक्तदाब आणि मधुमेहासारख्या व्याधी असलेल्या व्यक्तींनी उन्हाळ्यात विशेष खबरदारी घ्यावी. उन्हाळ्यात उष्माघात होण्याचे प्रमाण खूप वाढते. उष्माघातामुळे शरीराचे तापमान उच्च पातळीवर पोहचते. योग्य आणि वेळीच उपचार न मिळाल्यास संबंधित व्यक्ती दगावण्याची शक्यता असते. उष्माघातापासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळावे. दुपारी बारा ते चार घराबाहेर पडूच नये, काही महत्वाचे काम असेल तरच घराबाहेर पडावे. घराबाहेर पडताना टोपी, गॉगल, बूट, चपलांचा वापर करावा. हलकी, पातळ, सच्छिद्र कपडे वापरावेत. उन्हात काम करणाऱ्या व्यक्तींनी टोपी, छत्री, गॉगल यांचा नियमित वापर करावा. तापमान वाढले की शरीरातील पाणी कमी होते त्यामुळे डीहायड्रेशन होते. डीहायड्रेशन झाले की शरीरातील पाणी झपाट्याने कमी होते आणि चक्कर येते. त्यामुळे शरीरातील पाण्याची पातळी कमी होऊ नये यासाठी सतत पाणी पीत राहावे. शरीरात दररोज किमान दोन लिटर पाणी जाणे गरजेचे असते. घराबाहेर पडताना पाण्याची बाटली सोबत न्यायला विसरू नका. साध्या पाण्यासोबत नारळपाणी, भाज्यांचे, फळांचे रस दररोज प्यायले तरी हरकत नाही. मार्च महिन्यातच उन्हाळ्याच्या झळा जाणवू लागल्याने पुढील दोन महिने उष्णतेची तीव्रता किती असेल याची कल्पना केली तरी या वर्षीची उन्हाची दाहकता लक्षात येईल. त्यामुळेच प्रत्येकाने उन्हाळ्यात आपले आरोग्य सांभाळणे गरजेचे आहे. खबरदारी घेऊनच आपण उन्हाच्या तीव्रतेपासून स्वतःचा बचाव करू शकतो.

- श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

प्रसिद्ध कीर्तन प्रवचनकार सुरेखाताई शिंदे राजमाता जिजाऊ पुरस्काराने सन्मानित

अक्षराज : प्रतिनिधी

दि.१८, जुन्नर : राज्यभर कीर्तन प्रवचन सेवेद्वारे हिंदू संस्कृतीचे संस्कार, स्त्री सक्षमीकरण,अंधश्रद्धा निर्मूलन आणि समाज प्रबोधनाच्या माध्यमातून भागवत धर्माचा प्रचार करणाऱ्या प्रसिद्ध कीर्तन प्रवचनकार सुरेखाताई शिंदे यांचा नुकताच राजमाता जिजाऊ पुरस्काराने सन्मान करण्यात आला.त्यांच्या आजवरच्या समाजकार्याची दखल घेऊन जुन्नरच्या शिवनेरी स्मारक समितीच्या वतीने किल्ले शिवनेरी गडावर फाल्गुन वद्य तृतीया म्हणजेच १७ मार्च या तिथीनुसार साजऱ्या होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीदिनी राज्याचे कॅबिनेट मंत्री निलेश राणे यांच्या हस्ते हा सन्मानाचा पुरस्कार देण्यात आला.

हभप सुरेखाताई या गेली पंधरा वर्ष कीर्तन प्रवचनाच्या माध्यमातून गावोगावी जाऊन समाज प्रबोधनाचे महान कार्य करीत आहेत.अखंड हरिनाम सप्ताह, दशक्रिया विधी, वषश्राध्द अशा विविध कार्यक्रमातून त्यांनी राज्यभर समाजपरिवर्तनासाठी खुप प्रयत्न केले आहेत..सह्याद्री वाहिनीवरील सखी या कार्यक्रमामुळे तर त्या घराघरात पोहचल्या आहेत. कीर्तन प्रवचनाचे त्यांचे कार्यक्रम जुन्नर आंबेगाव तथा पुणे जिल्ह्यापुरतेच मर्यादित न राहता आता राज्यभर होऊ लागले आहेत.आपल्या कीर्तनातून भारतीय संस्कृती आणि यातही प्रामुख्याने हिंदू संस्कृतीविषयी त्या प्रामुख्याने परखड भाष्य करीत असतात.भागवत धर्माचा प्रसार करताना त्यांनी नेहमीच आपल्या संतांची शिकवण, संस्कारिक वारसा जोपासण्याचे आवाहन समाजाला केले आहे.

त्यांच्या याच अनन्यसाधारण कार्याची दखल घेत जुन्नरच्या शिवनेरी स्मारक समितीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती सोहळ्यात किल्ले शिवनेरीवर सन्मानाचा राजमाता जिजाऊ पुरस्कार देऊन यथायोग्य सन्मान केला. या सोहळ्यास आमदार शरद सोनवणे, डॉ.एकबोटे, शिव व्याख्याते सौरभ कर्डे, संतोष खैरे, शाहीर हेमंत मावळे, मधुकर काजळे, रमेश कर्पे आणि शिवप्रेमी जनता मोठ्या संखेने उपस्थित होती.

दरम्यान सुरेखाताई ताई यांच्या या सन्मानाने राज्यभरातून त्यांचेअभिनंदन होत असून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. नाभिक समाजातील विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांकडून देखील त्यांचे कौतुक होऊन त्यांना पुढील समाज कार्यास शुभेच्छा दिल्या जात आहेत.

रंग खरे..

छेडखानीकरेकुणी
खेळत असता रंग
खेळचाले वेगळाचं
अनैतिकता उत्सुंग

वासनोत्सव मनात
उफाळून येई उमंग
रंगोत्सवा गालबोट
सत्शीलता ती भंग

शिवराळ भाषेतूनि
दिसे मनातले व्यंग
अर्वाच्यदुषीतभाषा
कसा मोठा व्यासंग

हल्लकल्लोळ मोठे
ध्वनी प्रदूषण उत्तुंग
कायद्याचीऐशीतैशी
आम्ही स्वतात गुंग

झाकून जातीकिती
घडलेले अति प्रसंग
उघडेहोई कधीगुन्हे
जागवी समर प्रसंग

चांस मारुन घे कुणी
देताखेळात आलिंग
नितीमत्तेच्याउरीघुसे
अदृश्यअश्लील शिंग

न्हाहूनजाता रंगामधे
जणूंस्नान हो अभ्यंग
शिवीनको हवीओवी
गा पिढी रुढी अभंग

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

शिवप्रभू आचरणातही दिसावेत !

तिथीनुसार शिवजयंती नुकतीच पार पडली. त्याआधी १९ फेब्रुवारीला तारखेनुसार शिवजयंती साजरी करण्यात आली. तारखेनुसार आणि तिथीनुसार तितक्याच जल्लोषात जयंती साजरी केले जाणारे छत्रपती शिवाजी महाराज हे जगाच्या पाठीवरील एकमेव राजे आहेत. आपल्या अफाट बुद्धीचातुर्याने आणि अतुल पराक्रमाने पाच पातशाह्यांना शहा देणाऱ्या. कडे-कपाऱ्यांतील मावळ्यांचे संघटन उभारून हिंदवी स्वराज्य स्थापन करणाऱ्या महापराक्रमी, महाबली शिवरायांचा वारसा महाराष्ट्राला लाभला हे महाराष्ट्राचे परमभाग्यच म्हणावे लागेल. शिवरायांची कीर्ती आज सातासमुद्रापलिकडे पोहोचली आहे. जगातील अनेक विद्यापीठांमधून आज शिवरायांच्या पराक्रमाचा आणि त्यांच्या आदर्श राज्यकारभाराचा इतिहास शिकवला जात आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या शिवरायांचा राज्यातील प्रत्येकालाच सार्थ अभिमान आहे. हा अभिमान शिवजयंती, शिवराज्याभिषेक दिन यांसारख्या शिवोत्सवांना अधिक उफाळून येतो. प्रतिदिन घरात शिवरायांची मूर्ती अथवा प्रतिमा पुजण्याचा आणि घराबाहेर पडताना तिला मुजरा करण्याचा नित्यक्रम आजही अनेक घरांतून पाळला जातो. आपण शिवरायांचे पाईक आहोत याची जाण ठेवण्यासाठी कपाळावर चंद्रकोर लावणारे अनेक तरुण मुंबईसारख्या धावपळीच्या शहरातही ठिकठिकाणी पाहायला मिळतात. चारचाकी, तीनचाकी गाडीवर मागच्या बाजूला तर दुचाकीच्या दर्शनी भागावर छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र असलेले स्टिकर आणि भगवे ध्वज लावलेल्या गाड्या राज्यातील रस्त्यांवर सर्वत्रच पाहायला मिळतात. पुणे, सातारा, कोल्हापूर परिसरात गेल्यावर तेथील नागरिकांनी आपल्या बंगल्यांची, घरांची नावे ही शिवाजी महाराजांच्या इतिहासाला अनुसरून किंवा गडदुर्गांच्या नावाने ठेवलेली पाहायला मिळतात.

गळ्यात शिवरायांच्या चित्रांचे, शिवमुद्रांचे लॉकेट्स घालणारे, खिशाला महाराजांच्या चित्राचा बॅच लावणारे आणि महाराजांच्या चित्रांचे किचैन बाळगणारे राज्यात सर्वत्रच पाहायला मिळतात. हल्ली तर छत्रपती शिवाजी महाराजांसारखी दाढी आणि मिशी बाळगण्याची फॅशन तरुणवर्गात रूढ होत चालली आहे. शिवरायांप्रतीच्या श्रद्धेपोटी हे सर्व करणाऱ्या तरुणवर्गाच्या मनामध्ये शिवरायांप्रती प्रचंड आदर आणि आस्था असते यात दुमत नाही; मात्र मनातील आदर कृतीत आणण्यामध्ये आजचा तरुण कुठेतरी कमी पडत असतानाचे चित्र आज दिसत आहे. ट्रेन-बसच्या प्रवासात, रहदारीच्या ठिकाणी छत्रपती शिवरायांसारखी दाढी मिशी कोरणारे आणि कपाळावर चंद्रकोर रेखाटणारे अनेक तरुण आपापसांत बोलताना शिव्यांचा आणि अपशब्दांचा वापर सर्रासपणे करताना आढळतात. गाड्यांवर लावण्यात आलेले महाराजांच्या प्रतिमेचे अथवा नावाचे स्टिकर म्हणजे खुद्द महाराजच आहेत या भावाने त्याची नियमितपणे स्वच्छता करणारे शिवभक्तही तुलनेने कमीच आहेत. स्वतःला शिवभक्त म्हणवून घेणारे अनेक जण रस्त्यावर वाहतूक पोलिसांशी किंवा अन्य वाहनचालकाशी अरेरावी करताना किंवा वाद घालताना दिसून येतात. गाडीवर लावलेल्या स्टिकरच्या रूपाने आपल्यासोबत महाराजही आहेत आणि त्यांचे आपल्या प्रत्येक कृतीकडे बारीक लक्ष आहे हा भाव आपल्यात का निर्माण होत नाही ? जेव्हा आपण आपल्या गाडीवर महाराजांच्या प्रतिमेचे स्टिकर लावतो, गळ्यात शिवप्रतिमा परिधान करतो, कपाळावर चंद्रकोर लावतो आणि महाराजांसारखी दाढी मिशी ठेवतो तेव्हा या सर्वांसोबत आपली जबाबदारीही वाढते हे लक्षात घेतले पाहिजे. या सर्व गोष्टीविषयी आपल्यामध्ये तितकेसे गांभीर्य नसले, तरी समाज आपल्याकडे शिवभक्त म्हणून आदराने पाहतो हे ध्यानात ठेवायला हवे. त्यामुळे आपल्या प्रत्येक कृतीमधून शिवरायांच्या शिकवणुकीचा आदर्श दिसून यायला हवा. उपरोक्त गोष्टी परिधान करून आपण कार्यालयांत भ्रष्टाचार करत असू, गाडीवर महाराजांचे स्टिकर लावून वाहतुकीचे नियम पळत नसू, इतरांशी विनाकारण वाद घालत असू, घरी आई वडिलांचा आदर करत नसू, मुखातून अपशब्द उच्चारात असू तर समाज आपल्याकडे हीन दृष्टीने पाहिलच शिवाय प्रत्यक्ष छत्रपती शिवरायांचाही आपल्याकडून अवमान घडेल हे लक्षात घेण्याची आज नितांत आवश्यकता आहे. शिवरायांसारखे दिसणे, शिवप्रेमाचा देखावा करणे जेव्हढे सोपे आहे तेव्हढेच कठीण शिवरायांचा आदर्श कृतीत आणणे म्हणजेच शिवरायांना अपेक्षित अशी कृती करणे आहे. त्यामुळे आपल्यामुळे शिवरायांच्या प्रतिमेला धक्का लागणार नाही याची काळजी आपणच घ्यायला हवी. आपल्या प्रत्येकाच्या मनात आणि हृदयात छत्रपती शिवरायांविषयी नितांत आदर आणि श्रद्धा आहे त्यामुळे छत्रपतींचा आदर्श आपल्या नियमित आचरणातूनही वेळोवेळी दिसायला हवा !

जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई
संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

थोडक्यात

बाभळी तालुका हदगाव येथे शिवरायांचे मंदिर बांधण्याचा संकल्प

अक्षराज : चंद्रकांत भोरे

दि.१८, हदगाव (नांदेड) : तालुक्यातील बाभळी येथे गावठाण परिसरात महादेव मंदिराजवळ उपलब्ध असलेल्या जागेत छत्रपती शिवाजी महाराज यांचे मंदिर बांधावे अशी संकल्पना ग्रामसभेमध्ये नारायणराव पाटील बाभळीकर यांनी मांडली असून ग्रामसभेने सुद्धा या ठरावाला मान्यता दिली असल्याचे त्यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराज यांचे मंदिर अख्ख्या भारतामध्ये आंध्र प्रदेशातील श्रीशैलम येथे आहे. तिथे भवानी मातेने छत्रपती शिवाजी महाराजांना तलवार देतांना मुख्य मूर्ती असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील संपूर्ण प्रसंगाच्या विविध मूर्ती मधून संपूर्ण शिवचरित्र साकारण्यात आले आहे. याच धर्तीवर परंतु छोटेखानी छत्रपती शिवाजी महाराज यांचे मंदिर व्हावे, असा ठराव बाभळी येथील ग्रामसभेत नारायणराव पाटील यांनी मांडला. त्यांच्या संकल्पनेला गावकऱ्यांनी प्रतिसाद दिला असून लोकवर्गणीतून हे मंदिर व्हावे असा विचार सर्वांनी मांडला.

संभाजी पाटील खानसोळे यांचे निधन

अक्षराज : प्रतिनिधी

दि.१८, मुदखेड (नांदेड) : मुदखेड तालुक्यातील कामळज येथील ज्येष्ठ नागरिक कै.संभाजी आबाजी पा खानसोळे यांचे दि.१८ मार्च मंगळवार रोजी सकाळी १० वाजताच्या दरम्यान वृद्धापकाळाने त्यांचे राहत्या घरी निधन झाले. ते मृत्यू समयी ७२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात मुलगा सुन नातु असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर दि.१८ मार्च मंगळवार रोजी कामळज येथील स्मशानभूमीत दुपारी ४ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या जाण्याने कामळज गावावर शोककळा पसरली आहे. श्रीराम खानसोळे तुकाराम खानसोळे यांचे ते वडील होते.

म्हसणे फाटा येथे शिवरायांना अभिवादन...
मनसेच्या वतीने तिथीप्रमाणे शिवजयंती साजरी

अक्षराज : वसंत रांधवण

दि.१८, पारनेर (अहिल्यानगर) : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पारनेर तालुका उपाध्यक्ष रविश रासकर यांच्या पुढाकाराने शिवजयंतीचे आयोजन करण्यात आले होते. म्हसणे फाटा फेज २ एमआयडीसी चौकात उभारण्यात आलेल्या व्यासपीठावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे सर्वप्रथम पूजन करण्यात आले. यावेळी बोलताना रविश रासकर यांनी सांगितले की, महाराष्ट्र नवनिर्माण सेना दरवर्षी प्रमाणे यंदाही तिथीनुसार म्हसणे फाटा एमआयडीसी चौकात शिवजयंती उत्साहात साजरी करण्यासाठी पुढाकार घेत असते. मनसे नेते रविश रासकर व त्यांच्या मित्रपरिवार यांच्या हस्ते शीफळ फोडून महाआरतीची सुरुवात करण्यात आली. महाआरतीसाठी कैलास गाडीलकर, संदिप चव्हाण, संदिप भोर, स्वप्निल तरटे,योगेश कुलथे,अजय गाडीलकर, संतोष तरटे,अजय पठारे, प्रतिक शेळके, सोमनाथ तरटे यांच्यासह एमआयडीसी स्थानिक उद्योजक, शिवभक्त उपस्थित होते.

नेरुळ विभागात अतिक्रमण विभागाची धडक कारवाई

अक्षराज : जे. के. पोळ

दि.१७, नेरूळ, नवी मुंबई : महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) श्री. भागवत डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने नेरुळ विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील नेरुळ विभागाअंतर्गत आनंदा शेलार, एनएल-१/ए- ९/७, से.८, नेरूळ, नवी मुंबई यांचे सदर ठिकाणी प्रत्यक्ष पहाणी केली असता अंदाजे ३.६० मी द ८.३० मी मोजमापाचे जी+३ आरसीसी चे बांधकाम अनधिकृतरित्या करीत असल्याचे निदर्शनास आल्याने सदर अनधिकृत बांधकामधारकाला अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी नेरुळ विभाग कार्यालयाकडून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५४ अन्वये दि.१० मार्च २०२५ रोजी नोटीस बजावण्यात आलेली होती. तथापी नोटीसीची मुदत संपुष्टात येऊनही अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविण्यात आले नाही.

सदर कारवाई नेरुळ विभागाचे सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी जयंत जावडेकर, कनिष्ठ अभियंता संजय सोनटक्के व अतिक्रमण विभागातील कर्मचारी, मजुर, गॅसकटर, ब्रेकर, घन हातोडाच्या सहाय्याने अतिक्रमण विभागाकडील पोलीस पथक समवेत सुरक्षारक्षक यांच्या मार्फत करण्यात आली आहे.

कर थकबाकीदार जप्त मालमत्ता लिलावाद्वारे विक्री करणार

अक्षराज : जे. के. पोळ

दि.१८, नवी मुंबई : महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाने कर थकबाकी असलेल्या जप्त मालमत्तांची लिलावाद्वारे विक्री करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. जप्त केलेल्या मालमत्तांच्या लिलाव मूल्यांकनासाठी अधिकृत शासकीय मूल्यकारांची (गर्व्हनमेंट व्हॅल्युअर्स) नियुक्ती करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने जप्तीची कारवाई प्रस्तावित असलेल्या मालमत्ताधारकांनी आपला थकीत मालमत्ताकर त्वरित भरावा असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे अन्यथा जप्त केलेल्या मालमत्तांची लिलाव कारवाई करण्यात येईल असे सूचित करण्यात येत आहे. महानगरपालिकेच्या अखत्यारित असणाऱ्या विविध मालमत्तांवर 'कर आकारणी व कर संकलन विभाग' यांच्यामार्फत मालमत्ता कर आकारणी व वसूलीची कार्यवाही करण्यात येते. 'मालमत्ता कर आकारणी पुस्तकात नोंद असलेल्या मालमत्तांच्या करांची देयके (बिल) 'महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची 'ड' प्रकरण ८ नियम ३९ नुसार तयार करण्यात येतात. विहित मुदतीत मालमत्ता कर देयकांची रक्कम न भरलेल्या मालमत्तेवर कलम १२८ व प्रकरण ८, नियम ४२ ते ४८ मधील तरतुदीनुसार जप्ती कारवाई करण्यात येते. या जप्त मालमत्तांवर लिलावाद्वारे विक्री कार्यवाहीची तरतूद देखील नियमानुसार करण्यात आलेली आहे.

राज्यातील बसस्थानक अत्याधुनिक सेवासुविधायुक्त करणार : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

दि.१८, मुंबई : राज्यातील बसस्थानक अत्याधुनिक सेवासुविधायुक्त करण्यासाठी बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा या तत्वावर विकसित करण्यावर भर देण्यात येत आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग सावंतवाडी व अंबोली, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड बसस्थानकाला प्रवाशांसाठी रस्ता उपलब्ध करून देण्यात यावा तसेच जळगाव जिल्ह्यातील चोपडा बसस्थानक अत्याधुनिक बसपोर्ट उभारण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी अशा सूचना परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिल्या.

विधानभवन येथे राज्य परिवहन विभागाच्या विविध विषयाच्या अनुषंगाने बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत परिवहन मंत्री श्री.सरनाईक बोलत होते. यावेळी माजी मंत्री अब्दुल सत्तार, माजी मंत्री दीपक केसरकर, आमदार चंद्रकांत सोनावणे, एसटी महामंडळाचे बांधकाम महाव्यवस्थापक दिनेश महाजन, मुख्य लेखाधिकारी तथा आर्थिक सल्लागार गिरीश देशमुख यावेळी उपस्थित होते.

मंत्री श्री. सरनाईक म्हणाले की, शहर, तालुका व ग्रामीण भागातील परिवहन व्यवस्था बळकटीकरणासाठी बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा या तत्वावर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी, दोडामार्ग व अंबोली ही बसस्थानक विकसित करण्यात येतील. यावेळी माजी मंत्री दीपक केसरकर यांनी अंबोली येथील बसस्थानक पर्यटन दृष्ट्या महत्त्वाचे असून तेथे सर्व सुविधायुक्त नवीन बसस्थानक बांधण्यात यावे अशा सूचना केली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड

बसस्थानक येथे वारंवार होत असलेले अपघात लक्षात घेता या बसस्थानक परिसरात रस्ता उपलब्ध करून देण्यात यावा अशी येथील स्थानिकांची मागणी विचारात घेतली जावी अशी सूचना माजी मंत्री अब्दुल सत्तार यांनी केली. परिवहन मंत्री सरनाईक यांनी याबाबत लवकरच निर्णय घेऊन बसस्थानकात पर्यायी रस्ता उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासन दिले.

जळगाव जिल्ह्यातील चोपडा बसस्थानकाचे अत्याधुनिकीकरण करण्यात यावे याबाबतीत स्थानिक आमदार चंद्रकांत सोनावणे यांनी सूचना केल्या. मध्यप्रदेश राज्याच्या सीमावर्ती भागामध्ये असलेला आदिवासीबहुल तालुका म्हणून चोपडा तालुका ओळखला जातो. या तालुक्यातील महत्त्वाचे बसस्थानक म्हणून चोपडा बसस्थानक अत्याधुनिक सोयी युक्त बनविण्यात यावे अशी मागणी केली. याबाबतीत लवकरच निविदा प्रक्रिया राबवून बांधा वापरा व हस्तांतरित करा या तत्त्वावर चोपडा बसस्थानक विकसित करण्याच्या सूचना मंत्री श्री. सरनाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

सायबर साक्षरता काळाची गरज आहे - अतिरिक्त आयुक्त अमित सैनी

अक्षराज : प्रभाकर हजारे

दि.१८, मुंबई : नागरिकांच्या जीवनामध्ये मोबाईल हा अविभाज्य घटक झाला असून मोबाईल मानवाच्या प्राथमिक गरजांपैकी एक गरज असल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.मोबाईलचे परिणाम चांगले किंवा वाईट हे जरी ठरवता येत नसले तरी मोबाईल मुळे अनेकांना अनेक वेळा वेगवेगळ्या सायबर गुन्ह्यांना सामोरे जावे लागत आहे. मोबाईल द्वारे ऑनलाईन पद्धतीने दैनंदिन जीवनात होणाऱ्या अघटीत घटना,आर्थिक फसवणूक यांचे प्रमाण वाढत चालले आहे.हे टाळण्यासाठी विद्यार्थी सायबर साक्षरता काळाची गरज आहे. असे प्रतिपादन बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अमित सैनी यांनी केले. ते भायखळा येथील अण्णाभाऊ साठे सभागृहामध्ये सन २०२३-२४ यावर्षीच्या महापौर आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की मुंबई महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर विद्यार्थी केंद्रबिंदू मानून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना ज्ञानदान करावे.

विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यवहार ज्ञानाचीही जोड देऊन बँकेचे व्यवहार कसे करावेत याबाबत आवश्यक ती माहिती द्यावी. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने देण्यात आलेल्या महापौर आदर्श शिक्षक पुरस्कारा मुळे शिक्षकांची जबाबदारी

आणखीनच वाढली असून शिक्षकांनी आपल्या आदर्श वागण्याला कुठेही कसलेही गालबोट लागणार नाही याचीही काळजी घ्यायला हवी.समाजातील काही घाणेरड्या वृत्तीच्या लोकांमुळे पॉस्को सारखे गुन्हे घडत आहेत.मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये अशा प्रकारचे गुन्हे घडणार नाहीत याची दक्षता देखील सर्व शिक्षकांनी घ्यायला हवी.

या कार्यक्रमाला मनपाच्या शिक्षण उपायुक्त डॉ.प्राची जांभेकरही उपस्थित होत्या.त्यांनी आपल्या भाषणात शिक्षकांनी चार गोल समोर ठेवून कार्यरत रहावे.

FLN, एक लक्ष नवीन पट नोंदणी, गुणवत्ता, स्कॉलरशिप अशा बाबींवर शिक्षकांनी लक्ष देऊन महापालिकेच्या शाळांचा दर्जा उंच कसा राहील यासाठी प्रयत्न करावेत. यावेळी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे शिक्षण अधिकारी राजेश कंकाळ यांनी प्रस्ताविक केले. आपल्या प्रास्ताविक भाषणात शिक्षणाधिकारी राजेश कंकाळ म्हणाले की, शिक्षकाचे पद जरी एकच असले तरी कालानुरूप शिक्षकाचे अनेक रूप बदललेले आहेत.गुरुकुल कालीन शिक्षकांना गुरु म्हणून संबोधले जायचे,पुढे गुरुचे गुरुजी झाले, गुरुजीचे मास्तर झाले आणि आता मास्तरचे सर झाले. संबोधन वेगवेगळे असले तरी गुरुचे कार्य मात्र एकच आहे आणि ते पवित्र आहे. त्यामुळे आजही समाजामध्ये गुरुचे स्थान सर्वोच्च आहे.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संगीत कला अकादमीच्या वतीने सुरेल आवाजात स्वागत गीत गाऊन मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. दरवर्षी बृहन्मुंबई महानगरपालिके तर्फे पन्नास गुणी शिक्षकांना महापौर आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. त्यानुसार यावर्षीही शिक्षक दिनाच्या निमित्ताने ५० आदर्श शिक्षकांची निवड करण्यात आली होती.काही तांत्रिक व प्रशासकीय अडचणीमुळे हा कार्यक्रम उशिरा संपन्न झाला.बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत कार्यरत असलेल्या व राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झालेल्या सहा शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते येथोचित सन्मान करण्यात आला.यानंतर उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ५० गुणी शिक्षकांना महापौर आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.आकर्षक ट्रॉफी, मेडल, शॉल, पुष्पगुच्छ यासह रोख रक्कम अकरा हजार रुपयांचा धनादेश असे या बक्षिसाचे स्वरूप होते.

तत्पूर्वी डी डी उपाध्याय मार्ग उर्दू शाळेच्या शिक्षिका समिया शेख आणि गोवंडी येथील लिंबूनी बाग मराठी शाळा क्रमांक-१च्या चित्रकला शिक्षिका शिल्पा बनसोड यांची प्रतिनिधिक स्वरूपात भाषणे झाली. या कार्यक्रमाला बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमिक विभागाच्या शिक्षण अधिकारी सुजाता खरे,मध्यवर्ती उपशिक्षणाधिकारी कीर्तीवर्धन किरतकुडवे, अजय वाणी, लोकसहभाग कक्षाचे उपशिक्षणाधिकारी मुक्तार शहा, छाया साळवे, आरती खेर, ज्योती बकाने, विनोद कदम, निसार खान यांच्यासह सर्व अधीक्षक,प्रशासकीय अधिकारी,वरिष्ठ पर्यवेक्षक दत्तू लवटे,कनिष्ठ पर्यवेक्षक, सर्व विभाग निरीक्षक आणि मुख्याध्यापक,तसेच सन २०२१-२२ व २०२२-२३चे महापौर पुरस्कार प्राप्त शिक्षकही बहुसंख्येने उपस्थित होते.

महाटी येथे अखंड हरिनाम सप्ताहला उत्साहात सुरुवात...

अक्षराज : साहेबराव गागलवाड

दि.१८, मुदखेड (नांदेड) : मुदखेड तालुक्यातील मौजे महाटी येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी जगद्गुरु तुकाराम महाराज बिज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व ज्ञानयज्ञ सोहळा दि.१६ मार्च पासून प्रारंभ झाला. अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आणि ज्ञानयज्ञ सोहळा आयोजित करण्यात आले असून वर्षं १७ वे आहे, काकडा प्रमुख प्रभु पा लाठीकर,आनंदा पा तांदळीकर,रमेश पा वाडीकर, राजाराम मामा वंजारवाडी, बाबु पा अंचोलीकर, गायनाचार्य आनंदा पा तांदळीकर,प्रभु पा लाठीकर, नागोराव पा.काकांडीकर मृदंगाचार्य हभप माधव महाराज बेळकोणी, अक्षय महाराज काकांडीकर भजनी मंडळ टाकळी (मोरे) येळी, माळकौठा, चिलपिंपरी, रोहीपिंपळगाव, दरेगाव, भायेगाव, हातनी भागवतातील संगीत साथ ऑर्गन वादक हभप माऊली महाराज गिरी सरेगाव, तबलावादक हभप राम महाराज परभणीकर व गायक हभप सुभाषराव मगर परभणीकर या सप्ताहाचे मार्गदर्शक यंकटराव महाराज माळकौठेकर कोंडीबा पा.जाधव माळकौठेकर व्यंकटराव पा ढगे महाटीकर विणेकरी विठ्ठल पा ढगे, पुजेकरी मारोती

पांचाळ व समस्त गावकरी मंडळी महाटी यांच्या सहकार्याने या सप्ताहाची सुरुवात झाली आहे. त्यात पहाटे ४ते ६ काकडा भजन, ६ ते ९ ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, १०ते११ गाथा भजन, दुपारी ०१ते ४ भागवत कथा, सायंकाळी ६ ते ८ हरिपाठ आणि दररोज रात्री ९ते ११ या वेळात कीर्तनाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे ज्ञानेश्वरी पारायण प्रमुख हभप मारोती पा सिंधी,हभप व्यंकटी पा ढगे, हभप दतराम पा ढगे, हभप तुकाराम पा ढगे दि.१६ मार्च रोज रविवार सकाळी १२ ते २ या वेळेत हभप दिगांबर महाराज बोरगावकर यांचे बिजेचे किर्तन संपन्न झाले.

दररोज सायंकाळी या महाराजांची किर्तन सेवा होणार

हभप ज्ञानेश्वर महाराज काकांडी यांचे किर्तन दि.१६ मार्च रोजी रविवारी यांची किर्तनाची सेवा संपन्न झाली दि.१७ मार्च रोज सोमवार हभप राम गुरुजी पांगरीकर यांचीही किर्तन सेवा संपन्न झाली , दि.१८ मार्च रोज मंगळवार हभप विष्णू महाराज तांदळीकर यांचे किर्तन,दि.१९ मार्च रोज बुधवार हभप अनंता महाराज परभणीकर बेटकर यांचे किर्तन,दि.२० मार्च रोज गुरुवार हभप प्रताप महाराज पिंपळकौठेकर यांचे किर्तन ,दि.२१ मार्च रोज शुक्रवार हभप गंगाधर महाराज रेगांवकर यांचे कीर्तन,दि.२२ मार्च रोज शनिवार हभप मधुकर महाराज बारुळकर या महाराजांची सप्ताहाला कीर्तनाची सेवा लाभणार आहे,

दि.२२ मार्च रोजी दुपारी गाथापुजन व ग्रंथराज ज्ञानेश्वरी ग्रंथाची गावातील प्रमुख रस्त्याने भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. दि.२३ मार्च रविवारी रोजी हभप माऊली महाराज झरीकर यांचे सकाळी १० ते १२ या वेळात काल्याचे किर्तन होईल ह.भ.प.माऊली महाराज यांची काल्याच्या कीर्तनाची सेवा संपन्न झाल्यानंतर दुपारी १२ च्या नंतर गावकऱ्यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे या सप्ताहाचा लाभ गावकऱ्यांनी व या परिसरातील भाविक भक्तांनी घ्यावा असे आव्हान महाटी गावकऱ्यांच्या वतीने करण्यात येत आहे.

सुरभी स्वयंसेवी संस्था तर्फे अमली पदार्थ विरोधी व्यसनमुक्ती कार्यक्रम संपन्न

अक्षराज : अक्षय गिरा

दि.१८, अलिबाग (रायगड) : सुरभी स्वयंसेवी संस्था अलिबाग रायगड व राष्ट्रीय सामाजिक संरक्षण संस्था व सामाजिक न्याय मंत्रालय भारत सरकार यांच्यावतीने अमली पदार्थ सेवन प्रतिबंधक जागरूकता कार्यक्रम यामध्ये विविध स्पर्धांचे आयोजन तज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन करून अमली पदार्थ प्रतिबंध रोखण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. मा. शिक्षक सुभाष पानसकर, व सरोज पानसकर यांनी अलिबागमधील संपर्क बालग्राम बांधण मुलांना व मुलांना मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी मुलांना विविध छंद जोपासून स्वतःला व्यसनापासून कसे दूर राहता येईल व छत्रपती शिवाजी महाराज गड किल्ले या बद्दल माहिती अमेरीका मधील तंत्रज्ञान विषयी माहिती सांगितली दिली. सुरभी संस्थेचे अध्यक्षा सुप्रिया जेधे यांनी मुलांना व्यसनाचे दुष्परिणाम व आरोग्यावर होणारे परिणाम व्यसनाधिन होण्याची कारणे यावर तसेच व्यसनमुक्त भारत यावर मार्गदर्शनपर प्रबोधन केले. तसेच मुलांच्या विविध चित्रकला स्पर्धा राबवून व्यसनाविरोधी जनजागृती करण्यात आली मुलांना बक्षीस वितरण करून प्रशिस्तिपत्र व रोख बक्षिसे देण्यात आली तसेच मुलांना होळीनिमित्ताने पुरणपोळीचे वाटप करण्यात आले. याम ध्ये सुरभी संस्थेच्या सदस्य अपेक्षा जेधे, मीरा ठाकूर, संपर्क बालग्राम बांधण चे अधिक्षक विशाल वाघमारे व प्रशिक्षक उपस्थित होते.

जिल्हाधिका-यांनी घेतला कायदा व सुव्यवस्थेचा आढावा

आवश्यक तिथे प्रतिबंधात्मक कार्यवाही करा - जिल्हाधिकारी कुंभार

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.१८, अकोला : जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सर्व यंत्रणांनी सजग राहून कार्यवाही करावी. आवश्यक तिथे प्रतिबंधात्मक कार्यवाही करावी. कुठेही अनुचित प्रकार घडत असल्याचे आढळताच वस्तुस्थिती तपासून निष्पक्षपणे कारवाई करावी. नागरिकांमध्ये यंत्रणेबाबत विश्वासार्हता वृद्धिंगत करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे दिले.

नागपूर येथील सामाजिक तणावाच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेशी संबंधित सर्व यंत्रणांची ऑनलाईन बैठक जिल्हाधिका-यांनी घेतली, त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी बी.वैष्णवी, महापालिका आयुक्त सुनील लहाने, निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील, सर्व उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार, ठाणेदार, नगरपालिका मुख्याधिकारी आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. कुंभार म्हणाले की, नागपूर येथील घटनेच्या पार्श्वभूमीवर अकोल्यात कुठेही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सर्व यंत्रणांनी खबरदारी घ्यावी.

विविध मागण्यांची निवेदने देण्यासाठी मोठ्या प्रमाणात नागरिक जमा होतात. अशा ठिकाणी खबरदारी घ्यावी. स्थानिक स्तरावर मोर्चे, आंदोलनांना परवानगी देताना मुंबई पोलीस अधिनियमाद्वारे लागू आदेशांचे पालन होईल याची खातरजमा करावी. आवश्यक तिथे कठोर उपाययोजना राबवाव्यात. कोणत्याही धार्मिक स्थळांलगतच्या रस्त्यांवरून आंदोलन, मोर्चे काढू नये. पुढील काळात सण-उत्सव शांततेत पार पडतील याची दक्षता घ्यावी.ते पुढे म्हणाले की, स्थानिक स्तरावर कुठेही अनुचित प्रकार घडत असेल किंवा तसे घडण्याची शक्यता आढळल्यास त्याचवेळी जिल्हा प्रशासनाच्या निदर्शनास आणून द्यावे. सायबर पोलीस सेलकडून समाजमाध्यमांचे संनियंत्रण केले जाते. त्यासोबत उपविभागीय अधिकारी व तहसीलदार स्तरावरही संनियंत्रण व्हावे. माध्यमांना आवश्यक वस्तुनिष्ठ माहिती मिळेल याची दक्षता घ्यावी व संपर्कात राहून माहितीचे आदानप्रदान करावे. गावपातळीवरही चुकीचे संदेश प्रसारित होणार नाहीत याची काळजी घ्यावी. अधिका-यांनी या कालावधीत मुख्यालय सोडू नये. विनापरवानगी रजा कुणीही घेऊ नये, असे निर्देश त्यांनी दिले.

जिल्ह्यात रात्रीचा वीजपुरवठा खंडित होणार नाही याची दक्षता 'महावितरण'ने घ्यावी, तसेच सण-उत्सवानिमित्त सार्वजनिक ठिकाणी लावलेले झेंडे आदी बाबी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सणाचे औचित्य संपल्यानंतर तात्काळ हटवाव्यात. आवश्यक तिथे प्रतिबंधात्मक कार्यवाही करा, असे निर्देश त्यांनी दिले. पोलीस अधिक्षक श्री. सिंह म्हणाले की, सोशल मीडिया सेल द्वारा प्रसारित मजकुराचे संनियंत्रण होते. तथापि, सर्व यंत्रणांनीही आपल्या निदर्शनास आलेल्या बाबी तत्काळ कळवाव्यात. सर्व यंत्रणांमध्ये सतत संपर्क व समन्वय ठेवावा. गावपातळीवरील यंत्रणेपर्यंत ही याबाबतच्या सूचना तात्काळ प्रसारित केल्या जातील, असे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वैष्णवी यांनी सांगितले.

चंद्रभागा नदीच्या प्रदूषण मुक्तीसाठी 'नमामि चंद्रभागा' अभियान - पंकजा मुंडे

अक्षराज : प्रतिनिधी

दि.१८, मुंबई : पंढरपूर हे दक्षिण भारताची काशी म्हणून ओळखले जाते. त्यामुळे या पवित्र ठिकाणी असलेली चंद्रभागा नदी प्रदूषणमुक्त असायला पाहिजे. केंद्र शासनाच्या 'नमामि गंगा' या नदी शुद्धीकरण प्रकल्पाच्या धर्तीवर राज्यात चंद्रभागा नदीच्या प्रदूषण मुक्तीसाठी 'नमामि चंद्रभागा' अभियान राबविण्यात येत आहे, असे पर्यावरण वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

चंद्रभागा नदीच्या प्रदूषणाबाबत सदस्य अभिजीत पाटील यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य समाधान आवताडे, राजू खरे यांनीही सहभाग घेतला. या प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, 'नमामी चंद्रभागा' अभियानांतर्गत ४८.२५ कोटी किमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या आहेत. राज्य शासनाने ३४.६५ कोटी इतका निधी वितरित केला आहे. या योजनेअंतर्गत सांडपाणी व्यवस्थापन व अनुषंगिक कामे प्रगतीपथावर आहेत.

चंद्रभागेच्या प्रदूषणाबाबत तक्रार आल्यास तात्काळ कारवाई करण्यात येईल. पंढरपूर शहर तसेच आजूबाजूच्या परिसरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

पंढरपूर शहरातून वाहणाऱ्या चंद्रभागेच्या प्रदूषणाबाबत पंढरपूर शहराचा दौरा करून परिस्थितीची पाहणी करण्यात येईल. याबाबत आढावा घेण्यात येईल. पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, जलसंपदा विभाग या संबंधित विभागांना ही यावेळी आमंत्रित केले जाईल, असेही पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

तरुणांना रोजगाराभिमुख अभ्यासक्रम विद्यापीठांनी द्यावा - तुषार गोळेगावकर

अक्षराज : बालासाहेब फुलपगार

दि.१८, पालम (परभणी) : स्पर्धेच्या युगात ग्रामीण भागातील तरुणांना रोजगार उपलब्ध होईल असा अभ्यासक्रम विद्यापीठ स्तरावर तयार झाला तर उच्च शिक्षणात तरुणांचा सहभाग निश्चित वाढेल असे प्रतिपादन श्री बळीराजा शिक्षण संस्था सोमेश्वर चे अध्यक्ष तुषार गोळेगावकर यांनी आज मंगळवार, दिनांक १८ मार्च २०२५ रोजी केले. ते शहरातील माधवराव पाटील महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या समाजशास्त्र विषयाच्या पदवी द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रम कार्यशाळेत अध्यक्ष स्थानावरून बोलत होते.

यावेळी या कार्यशाळेचे उद्घाटन म्हणून समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.शाहीनाथ घायाळ हे होते. तर या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ.हरीश सातपुते, प्राचार्य डॉ.ए.टी शिंदे, डॉ.नारायण कांबळे, डॉ. अशोक मोटे, डॉ.रामचंद्र भिसे, डॉ. वेदप्रकाश मलवाडे यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना गोळेगावकर म्हणाले की, सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. प्रत्येक विषयाचा अभ्यासक्रम हा विज्ञान आणि तंत्रज्ञानाला समांतर असला पाहिजे. समाजशास्त्राच्या अभ्यासक्रमाने विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणिवा समृद्ध करताना त्यांना दैनंदिन जीवनात रोजगार उपलब्ध करून देण्यामध्ये ही महत्त्वाची भूमिका बजावली पाहिली.

यावेळी उद्घाटन करताना डॉ.घायाळ म्हणाले की, नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० प्रमाणे निर्माण होणारा अभ्यासक्रम हा विद्यार्थी केंद्रित असेल

त्यातून विद्यार्थ्यांचे भविष्य आणि जीवन उन्नत करण्याचा प्रयत्न अभ्यास मंडळ करेल. यावेळी डॉ.कांबळे आणि डॉ.मोटे यांनी ही आपले मनोगत व्यक्त करून उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी समाजशास्त्र अभ्यासक्रमाचे सर्व सदस्य उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक डॉ.नानासाहेब पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ.संजय बालाघाटे यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ.कालिदास गुडदे यांनी मांडले. कार्यक्रमाला नांदेड परभणी हिंगोली आणि लातूर जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणात प्राध्यापकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य डॉ.आत्माराम आरसुळे, डॉ. सुखदेव चव्हाण, डॉ.भारत शिंदे, डॉ.उद्धव निर्वळ यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

नागरी भागातील बालकांच्या सुपोषणासाठी नागरी बाल विकास केंद्र उपयुक्त

सुपोषित मुंबई अभियान व नागरी बाल विकास केंद्र योजनेचा शुभारंभ

अक्षराज : प्रतिनिधी

दि.१८, मुंबई : नागरी क्षेत्रातील कुपोषित बालकांना सर्वसाधारण श्रेणीत आणण्यासाठी सुपोषित मुंबई अभियान व अंगणवाडी मध्ये नागरी बाल विकास केंद्र सुरू करण्यात आले आहेत. गरोदर मातांना गर्भधारणेपासून पहिल्या एक हजार दिवसांसाठी बालकांना योग्य पोषण मिळण्याच्या दृष्टीने नागरी बाल विकास केंद्र अतिशय उपयुक्त ठरणार आहेत, असे प्रतिपादन महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले. कुलाबा, अंगणवाडी क्र. ५१ येथे सुपोषित अभियान व नागरी बाल विकास केंद्र योजनेचा शुभारंभ मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमास एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे आयुक्त कैलास पगारे, दक्षिण मुंबई बाल विकास प्रकल्प अधिकारी नितीन मस्के, माहिला बाल विकास विभागाचे संबंधित अधिकारी, अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्यासह माता व बालके उपस्थित होते.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, एकात्मिक बाल विकास सेवा ग्रामीण प्रकल्पातील कुपोषित बालकांना सर्व साधारण श्रेणीत आणण्यासाठी ग्रामीण तसेच आदिवासी क्षेत्रातील अंगणवाडी केंद्रामध्ये ग्राम बाल विकास केंद्र योजना २०१८ पासून कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेचा चांगला परिणाम बालकांच्या आरोग्यावर होत असून त्यांना योग्य वयात पोषण आहार मिळण्यास मदत होत आहे. याच धर्तीवर नागरी भागातील कुपोषित बालकांना सर्व साधारण श्रेणीत आणण्यासाठी तसेच मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यातील बालकांचे कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी सुपोषित मुंबई अभियान व नागरी बाल विकास केंद्र योजना राबविण्यात येत आहे.

महिलेच्या गर्भधारणेपासून पहिल्या एक हजार दिवसांच्या कालावधीत माता व बालकांना योग्य पोषण आहार मिळणे आवश्यक असते. याच दृष्टिने नागरी भागातील या केंद्रांच्या मार्फत बालकांच्या कुपोषणासोबतच त्यांच्यातील लठ्ठपणा कमी करण्यासाठी देखील मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचेही यावेळी मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

प्रत्येक बालकाचा बौद्धीक व शारीरिक विकास हा महिलेच्या गर्भधारणेपासून एक हजार दिवसांच्या कालावधीत होत असते. त्यामुळे या काळात माता व बालकांचे योग्य पोषण होण्यासाठी नागरी भागातील लोकसंख्येच्या प्रमाणात अंगणवाडींची संख्या वाढविण्यासाठी विभागामार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत. शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या सुपोषित मुंबई अभियान व नागरी बाल विकास केंद्र योजनेच्या लाभापासून नागरी क्षेत्रातील एकही बालक वंचित राहणार नाही, यासाठी संबंधित सर्व अधिकारी यांनी नियोजन करून अंमलबजावणी करावी, अशा सूचनाही यावेळी मंत्री आदिती तटकरे यांनी दिल्या. बालकांमधील कुपोषण कमी करणे व गर्भधारणेपासून पहिले दोन वर्ष माता व बालकांच्या आहाराची काळजी कशी घ्यावी. याबाबत करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती विभागाचे आयुक्त कैलास पगारे यांनी प्रास्ताविकात दिली.

थोडक्यात

अणुऊर्जा विधायक वापरातून देश २०४७ पर्यंत विकसित-राजपत्रित अधिकारी वाघ

अक्षराज : बाळू धायगुडे

दि.१८, खंडाळा (सातारा) : सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय खंडाळा येथे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ सोहळा नुकताच संपन्न झाला. यासाठी प्रमुख अतिथी म्हणून भाभा परमाणु अणुसंशोधन केंद्राचे वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी तथा राजपत्रित अधिकारी प्रा.डॉ.पी.बी.वाघ यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ.वाघ म्हणाले, जगातील तसेच भारतातील पारंपारिक ऊर्जास्रोत २०४५-२०५० सालापर्यंत संपण्याच्या मार्गावर असतील. त्यामुळे ऊर्जा संकट हे देशासमोर ठाकणार आहे. तेव्हा येत्या काळात ऊर्जाक्षेत्रात विद्यार्थ्यांना भाभा परमाणु अणुसंशोधन केंद्र सारख्या नामांकित संस्थेमध्ये नाभिकीय क्षेत्रात संशोधनाची तसेच रोजगाराची मोठी संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध असेल. डॉ.वाघ पुढे म्हणाले, Green House Effect व Global Warming याबाबत माहिती देऊन त्यांचे गांभीर्य समजावले. तसेच कार्बन उत्सर्जन रोखण्याकरिता नाभीकीय ऊर्जेसाठी उपलब्ध संधींचे विद्यार्थ्यांनी आपल्या गुणकौशल्याने सोने करण्याबाबत आवाहन केले. त्याचप्रमाणे Hydro Power Station यामुळे भूसंपादन व त्यामुळे विस्थापित जमीनधारक व सिलिंग स्लॅब वाले शेतकरी यांचे नुकसान टाळणेकामी भारत सरकारच्या (NPCIL) जैतापूर सारखे १० हजार मेगावॅट नाभिकीय ऊर्जा प्राप्त होणेकामी उपाययोजना असलेबाबत आपले विचार मांडले. विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती वाढावी याकरिता खंडाळा महाविद्यालयातील सर्वच प्राध्यापक वर्ग परिश्रम घेत आहेत याबद्दल डॉ.वाघ यांनी कौतुक केले.प्राचार्य डॉ.हणमंत जाधव यांनी प्रास्ताविक, स्वागत व परिचय करत डॉ. वाघ यांना आवर्जून निमंत्रित करण्याचा शुद्ध हेतू सांगितला.अध्यक्षस्थानाचे मनोगत व्यक्त करताना संजीव शंकरराव गाढवे म्हणाले-ग्रामीण तरुणाईने न्यूनगंड न बाळगता, विज्ञान आणि अणुसंशोधन क्षेत्रात विविध करिअर संधीचा शोध घेऊन सहभाग घ्यावा.कार्यक्रमास लोणंद येथील प्रिव्हिलेज प्रा.लि.एच.आर. हेड बाळासाहेब वाघ, अष्टविनायक ग्लास प्रा.लि.खंडाळा चे एच आर प्रमुख दिपक शिर्के,खंडाळा विभाग शिक्षण समितीचे उपाध्यक्ष सुरेश पवार,संचालक वि.ना. लांडगे,वसंतराव पंडित संचालिका डॉ.शोभा चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयातील कला, वाणिज्य,विज्ञान, बीसीए शाखेच्या विद्यार्थ्यांनी २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात वेगवेगळ्या क्षेत्रात मिळवलेल्या पारितोषिकांचे वितरण डॉ. पी.बी.वाघ व विविध मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.महाविद्यालयाचे वार्षिक अहवाल वाचन कार्याध्यक्ष प्रा.शर्मिला सावंत, विद्यार्थी शैक्षणिक प्रगती आढावा व पुरस्कार वाचन प्रा.अस्मिता येवले यांनी क्रीडा अहवाल क्रिडा संचालक प्रा.अनिकेत गायकवाड,विद्यार्थी विशेष कौशल्य व स्पर्धा सहभाग अहवाल वाचन प्रा.अमीर इनामदार यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.प्रतिक्षा माने तसेच आभार डॉ.प्रतिभा पाटणे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पारितोषिक वितरण समिती विभागप्रमुख प्रा.भारती चव्हाण, समिती सदस्य प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी वृंद यांनी विशेष परिश्रम घेतले.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी गणेश हत्तीआंबीरे

अक्षराज : बालासाहेब फुलपगार

दि.१७, पालम (परभणी) : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी सार्वजनिक जयंती उत्सव विविध कर्यक्रमाने साजरी होणार आहे. यासाठी बौद्ध विहार पालम येथे बैठकीचे आयोजन करण्यात येऊन सार्वजनिक जयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी सर्वानुमते गणेश विठ्ठलराव हत्तीआंबीरे,

उपाध्यक्ष महिंद्रापाल देविदास हनवते, सचिवपदी सूर्यकांत सखाराम रायबोले, कार्याध्यक्ष अरविंद शेषराव थिटे, सह कार्याध्यक्ष अजयराजे अंबादास हनवते, कोषाध्यक्ष सिद्धार्थ रामराव वावळे, संघटक आकाश सखाराम हत्तीअंबिरे, सहसचिव जयपाल सोमनाथ गाडे, सह कोषाध्यक्ष कमलाकर संभाजी वायवळ, सहसंघटक मंगेश भीमराव जोंधळे, स्वागत अध्यक्ष जालिंदर सोनाजी हत्तीआंबिरे, गौतम गोपाळराव हत्तीअंबिरे, संजय रामराव थिटे, निवृत्ती संभाजी हत्तीआंबिरे, वैजनाथ शंकरराव हत्तीआंबिरे, मधुकर मारुती हनवते, ऍड. राहुलकुमार हत्तीआंबिरे, सल्लागार सखाराम हत्तीअंबिरे, शेषराव थिटे, भुजंगहत्तीअंबिरे, रोहिदास हनवते, गणपतराव हत्तीअंबिरे, ज्ञानोबा हनवते, नवनाथ हत्तीअंबिरे, दिलीप हत्तीअंबिरे, महेंद्र कुमार रोहिणकर, माधव हनवते, संजय शेळके, संजय वावळे, बापूसाहेब हनवते, काशिनाथ थिटे, शंकर गायकवाड व प्रसिध्दी प्रमुख शांतीलाल शर्मा, मारूती नाईकवाडे, बालासाहेब फुलपगार, धोंडीराम कळंबे, शिवाजी शिंदे,चॉद तांबोळी,गोविंद सोलेवाड, सग्राम खेडकर, यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

प्रतिवर्षी प्रमाणे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उस्तव समितीच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन केले असून यामध्ये दि. ११ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता महात्मा जोतिबा फुले यांची जयंती सोहळा साजरा होणार असून यावेळी महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन तसेच सायंकाळी रविराज भद्रे व आम्रपाली खराटे यांच्या भीम गीता वर आधारित गायनाचा कार्यक्रम होईल. दि.१२ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता महाराष्ट्राच्या महागायीका मीराताई उमप यांचा आंबेडकरी जलसा कार्यक्रम होणार असून दि.१४ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ९ वाजता मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन व पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण संपन्न होईल तसेच दुपारी दोन वाजता पालम शहरातील मुख्य रस्त्यावरून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक निघेल व सायंकाळी ७ वाजता बौद्ध वंदने ने विसर्जन होईल.

या दरम्यान साय.८ वाजता पंकज भारती छ.संभाजीनगर त्यांची व्याख्यान यानंतर ९ वाजता महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक प्रकाशदीप वानखेडे व सुप्रसिद्ध गायिका आशा ताई चरवे यांच्या भीम गीतांचा गायनांचा दणदणीत सामना होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंती महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमास सर्व जनतेने उपस्थित राहण्याचे आवाहन जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष गणेश हत्तीअंबिरे व सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.